# पॅलिंड्रोम

पॅलिंड्रोम म्हणजे एखादा शब्द किंवा एखादे वाक्य किंवा अंकांचा एखादा गट उलट सुलट कसाही वाचला तरी सारखाच येतो. जे पूर्णांक उलटीकडून लिहिले तरी सारखेच दिसतात त्यांनाही पॅलिंड्रोमच म्हणतात. ज्यांना शब्दांशी आणि आकड्यांशी खेळायला आवडते, त्यांना अशा बाबींमध्ये खूपच आनंद वाटतो.

मराठीतील अशी काही उदाहरणे शोधा पाहू.
आता एक उदाहरण घेऊया. 132 ही संख्या म्हणजे काही पॅलिंड्रोम नव्हे. पण ती उलटी करा आणि तीच परत त्यात मिळवा.
132 + 231 = 363.
काही वेळा असा पॅलिंड्रोम मिळायला बराच वेळ लागेल.
उदाहरण म्हणून आपण 68 हा आकडा घेऊया.
68 + 86 = 154
154 + 451 =605
605 + 506 = 1111

ज्या दोन आकडी संख्यांतील अंकांची बेरीज 10 पेक्षा कमी असेल, त्यांचा पहिल्या पायरीतच दोन आकडी पॅलिंड्रोम मिळेल. त्यांची बेरीज जर 10, 11, 12, 13, 14, 15, 16 किंवा 18 असेल तर पॅलिंड्रोम मिळण्यासाठी अनुक्रमे 2, 1, 2, 2, 3, 4, 6, 6 पायऱ्या घ्याव्या लागतील.

हे तुम्ही स्वत: करून पाहा, तुम्हाला मजा येईल.




आता काही इंग्रजी शब्दांचे पॅलिंड्रोम पाहूया :

DAD
RADAR
EVIL OLIVE
MADAM I'M ADAM
DO GEESE SEE GOD?
NEVER ODD OR EVEN
MA IS A NUN AS I AM
A DOG! A PANIC IN A PAGODA!
CIGAR? TOSS IT IN A CAN, IT IS SO TRAGIC

